सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – १७२५प्र. क्र.२५१/मांत दि. २७/०३/२०२६

**विषय:-** महाराष्ट्र शासनाच्या सर्व योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी एकमेव लॉगिन यंत्रणा (Single Sign on (SSO)म्हणून महाआयडीचा वापर अनिवार्य करणे तसेच महासारथी प्रकल्प राबविण्यासाठी यंत्रणा सुनिश्रित करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७२५प्र.क्र.२५१/ मांत दि. २७/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२७१३४२३२८५०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 01-04-2026 18:09:51

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र शासनाच्या सर्व योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी एकमेव लॉगिन यंत्रणा (Single Sign On (SSO)) म्हणून महाआयडीचा वापर अनिवार्य करणे तसेच महासारथी प्रकल्प राबविण्यासाठी यंत्रणा सुनिश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (मातं)**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१७२५/प्र.क्र. २५१/मातं**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २७ मार्च, २०२६

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र शासन नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजनांचे लाभ थेट हस्तांतरण पध्दतीने (डीबीटी) वितरित करते. यामध्ये अनुदान व रोख मदत इत्यादींचा समावेश आहे. हे लाभ व्यक्ती, कुटुंबे, महामंडळे, खाजगी सेवा प्रदाते, सार्वजनिक सेवा संस्था, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी यांना हस्तांतरीत केले जातात. याव्यतिरिक्त, राज्य शासन नागरिकांना अनेक सेवा प्रदान करते. अशा प्रकारे कल्याणकारी योजनांसाठी थेट लाभ हस्तांतरीत करताना किंवा सेवा प्रदान करताना राज्य शासनाच्या विविध विभागांच्या विविध सेवा नागरीकांना पुरविताना शासनास अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सामाजिक लाभाच्या योजनांच्या अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाच्या सर्व योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी एकमेव लॉगिन यंत्रणा (Single Sign On (SSO)) म्हणून महाआयडीचा वापर अनिवार्य करणे तसेच महासारथी प्रकल्प राबविण्यासाठी यंत्रणा सुनिश्चित करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

महासारथी पोर्टल चा वापर करून प्रत्येक लाभार्थ्यास महाआयडी उपलब्ध करुन देणेबाबत तसेच या महाआयडीचा एकमेव साईन-ऑन (SSO) यंत्रणा म्हणून वापर अनिवार्य करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ घेण्यासाठी महाआयडी प्रदान करण्यात येईल. सदर महाआयडी दिनांक १ मे, २०२६ पासून अनिवार्य करण्यात येत आहे. याकरिता www.mahasarathi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

२. महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधीनस्त कार्यालये, महामंडळे, सार्वजनिक सेवा संस्था, शैक्षणिक संस्था इ. यांना त्यांच्या संबंधित पोर्टल अथवा डेटाबेस मध्ये महाआयडी संलग्न (SEED) करणे अनिवार्य असेल.

३. महासारथी प्रकल्प राबविताना नागरीकांच्या माहितीच्या संरक्षणाबाबत अस्तित्वात असलेले सर्व कायदे/नियमांच्या तरतुदी उदाहरणार्थ आधार कायदा २०१६, डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (DPDP) कायदा २०२३, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० इत्यादी लागू राहतील.

४. महासारथी प्रकल्पाची प्रभावी आणि कालबद्ध अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, संपूर्ण नियोजन, समन्वय आणि प्रकल्प देखरेखीसाठी एक मजबूत प्रशासकीय संरचना तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार महासारथी प्रकल्पासाठी “महासारथी प्रकल्प शिखर समिती (MahaSarathi Project Apex Committee)”, “महासारथी प्रकल्प कार्यकारी समिती (MahaSarathi Project Executive Committee)” व महासारथी प्रकल्प अंमलबजावणी समिती (MahaSarathi Project Implementation Committee) या समित्यांची स्थापना तसेच सदर समित्यांची कार्यकक्षा निश्चित करण्यात येत आहे.

**अ) महासारथी प्रकल्प शिखर समिती (MahaSarathi Project Apex Committee)**

महासारथी प्रकल्प शिखर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| **महासारथी प्रकल्प शिखर समितीची रचना** | |
|---|---|
| मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| मा. मंत्री, वित्त व नियोजन, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| मा. मंत्री, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |

| | |
|---|---|
| अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा. प्र.) विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य-सचिव |
| संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) | सदस्य |
| नामनिर्देशित सदस्य -१ (माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील संस्थेचे तज्ञ प्रतिनिधी) | सदस्य |
| नामनिर्देशित सदस्य -२ (माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील संस्थेचे तज्ञ प्रतिनिधी) | सदस्य |

**महासारथी प्रकल्प शिखर समितीचे अधिकार व कार्यकक्षा :-**

१) महाआयडी क्रमांक जारी करण्यासाठी धोरण ठरविणे, प्रणाली व कार्यपद्धती विकसित करणे बाबत निर्णय घेणे.

२) माहिती मानके (Data Standards) व कार्यपद्धतींबाबत शासकीय यंत्रणांना निर्देश देणे.

३) महासारथी प्रकल्प राबविण्यासाठी वार्षिक आर्थिक अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) महासारथी प्रकल्पाच्या माहितीचे व्यवस्थापन, माहितीच्या सुरक्षेसंदर्भात मानके तसेच इतर तांत्रिक सुरक्षा उपायांबाबत नियम व कार्यपद्धती निश्चित करणे.

५) नागरिकांसाठी तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्यास मान्यता देणे.

६) महासारथी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सहाय्य करण्यासाठी आवश्यकतेनुसार इतर समित्या किंवा कार्यदलांची नियुक्ती करणे.

७) शिखर समितीच्या कार्यासाठी आवश्यक असलेली मालमत्ता संपादन करणे.

८) शिखर समितीची कार्ये पार पाडण्यासाठी विविध स्त्रोतांकडून सहाय्य किंवा अनुदान स्वीकारणे.

९) महासारथी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार कार्यपद्धती बनविणे व त्यात सुधारणा करणे.

१०) शिखर समितीमधील नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

**आ) महासारथी कार्यकारी समिती** (MahaSarathi Executive Committee)

महासारथी कार्यकारी समितीची रचना खालील प्रमाणे असेल:-

| **महासारथी कार्यकारी समितीची रचना** | |
|---|---|
| मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा. प्र.) विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य सचिव |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग (न.वि. १), महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग (न.वि. २), महाराष्ट्र शासन | सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) | सदस्य |
| शिखर समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनास वेळोवेळी योग्य वाटेल असे, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, नेटवर्क सुरक्षा, डेटा विश्लेषण, डेटा सुरक्षा, डेटा व्यवस्थापन, डेटा वेअरहाऊसिंग, गोपनीयता अथवा संविधानिक कायदा, वित्त व अर्थशास्त्र या क्षेत्रांतील तज्ञ. | निमंत्रित सदस्य |

**महासारथी कार्यकारी समितीची कार्यकक्षा :-**

१) महासारथी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सर्वसमावेशक नेतृत्व, दृष्टी आणि दिशा प्रदान करणे.

२) महासारथी प्रकल्पाचे नियोजन करणे, समन्वय तथा देखरेख ठेवणे, तसेच वेळोवेळी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३) महासारथी प्रकल्पाच्या नियामक बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे, नियंत्रण ठेवणे आणि प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे.

४) महासारथी प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी पूरक आणि अनुकूल वातावरण निर्माण करणे.

५) महासारथी प्रकल्प राबविताना उद्भवणाऱ्या बाबींचा विचार करून बदल नियंत्रण नोंदीस (Change Control Note) मंजुरी देणे.

६) अर्थसंकल्पीय गरजांचा आढावा घेणे आणि मंजूर निधीच्या खर्चाबाबत आढावा घेणे.

७) शिखर समितीने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अद्यावत कार्यपद्धती अवलंबणे.

**इ) महासारथी प्रकल्प अंमलबजावणी समिती** (MahaSarathi Project Implementation Committee)

महासारथी प्रकल्प अंमलबजावणी समितीची रचना खालीलप्रमाणे असेल

| **महासारथी प्रकल्प अंमलबजावणी समितीची रचना** | |
|---|---|
| अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा. प्र.) विभाग, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र राज्य | सदस्य सचिव |
| व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) | सदस्य |
| मुख्य परिचालन अधिकारी, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) | सदस्य |
| महासारथी प्रकल्प / विभाग प्रमुख | सदस्य |
| महासारथी प्रकल्प निरीक्षण यूनिट (PMU) / महासारथी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) | निमंत्रित सदस्य |
| महासारथी प्रकल्प संचालक, सिस्टम इंटीगरेटर (SI) | निमंत्रित सदस्य |

**महासारथी प्रकल्प अंमलबजावणी समितीची कार्यकक्षा :-**

१) शासकीय विभागांना योजना, सेवा व लाभांच्या अनुषंगाने प्रमाणीकरण (Authentication) सुविधा उपलब्ध करून देणे.

२) नागरिकांची माहिती नियमितपणे अद्यावत राहील हे सुनिश्चित करणे.

३) शासकीय धोरणे, योजना, सेवा, लाभ किंवा अनुदाने यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांच्या माहितीच्या विश्लेषण इत्यादी बाबत पर्यवेक्षण करणे.

४) राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, सेवा, लाभ किंवा अनुदानांसाठी “महाआयडी” वापरासाठी उपलब्ध करून देणे.

५) महाआयडीद्वारे शासकीय विभाग किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्याकडे संकलित व संग्रहित माहितीच्या प्रमाणीकरण/सत्यापनाची सुविधा उपलब्ध करून देणे.

६) महाआयडी क्रमांक निष्क्रिय (Deactivation) करण्याची कार्यवाही करणे.

७) प्रभावी माहिती व्यवस्थापन व सेवा वितरणासाठी विविध विभागांच्या तांत्रिक पथकांशी समन्वय साधणे.

८) शिखर समितीने व कार्यकारी समितीने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अंमलबजावणी करणे.

५. सदर शासन निर्णय दिनांक २४.०३.२०२६ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा त्याचा संकेतांक २०२६०३२७१३४२३२८५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.03.27 13:43:35 +05'30'

**( दुर्गाप्रसाद मैलावरम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण )यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,

१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,

१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,

१५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१७) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१८) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२०) सर्व पोलीस आयुक्त,

२१) सर्व विभागीय आयुक्त,

२२) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,

२४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

२५) सर्व जिल्हाधिकारी,

२६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२७) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,

२८) संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई,

२९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी)

३०) सर्व मंत्रालयीन विभाग,

३१) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई,

३२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

३३) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

३४) निवडनस्ती/मातं.